| MHPA220004952023 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०३/०८/२०२३ |
| | नोंदणी तारीख | : | ०३/०८/२०२३ |
| | निकाल तारीख | : | ३१/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०२ व. ११ म. २८ दि. |

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**<u>पालम येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासिन अधिकारी मनिषा म. पाटील)**

**(जाहीर दिनांक ३१/०७/२०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ६६/२०२३**

(गु.र. क्र. ४८/२०२३ पालम पोलीस ठाणे)

**<u>निशाणी क्रमांक ६०</u>**

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकारतर्फे,**

**पोलीस निरीक्षक,**

पालम पोलीस ठाणे, ता. पालम, जि. परभणी

**प्रतिनिधीत्व** **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एन. डावकरे**

**आरोपी** **गजानन नागोराव पोले**

वय–२७ वर्षे, व्यवसाय–काही नाही

रा. मोजमाबाद, ता. पालम, जि. परभणी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपींकरिता श्री. एस. आर. रोकडे**

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २०/०३/२०२३ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २०/०३/२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | ०३/०८/२०२३ |
| आरोपींविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २४/०४/२०२४ |

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १०/०१/२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | ३१/०७/२०२६ |
| निकालाची तारीख | ३१/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **गजानन नागोराव पोले** | २१.०३.२०२३ | २१.०३.२०२३ | भा.द.सं कलम ३७९ म. ज. म. अ. कलम ४८ (७)(८) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |

**भाग 'क'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

## <u>सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | गंगाधर देवराव शिंदे | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| अ.सा.२ | विलास आनंदराव बळवंते | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/फिर्यादी |
| अ.सा.३ | व्यंकट जयवंतराव येवते | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## <u>सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी</u>

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | **नि. १६/अ.सा.क्र.१** | घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.सा.क्र. १ ची सही |
| २. | **नि. १७/अ.सा.क्र.१** | जप्ती पंचनाम्यावरील अ.सा.क्र. १ ची सही |
| ३. | **नि. ३०** | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| ४. | नि.३१ | प्रथम खबरी अहवाल |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | एक पांढऱ्या व भगव्या रंगाचा टाटा टिप्पर क्र. एम-एच-२२-एल.टी-२७०६ |
| २. | -- | सुमारे रू. ८०००/- किंमतीची दोन ब्रास रेती |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक- ३१/०७/२०२६)

प्रस्तुत आरोपीचेविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व जमीन महसुल अधिनियम कलम ४८ (७) व (८) प्रमाणे खटला चालविण्यात आला.

०२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे-**

दि. २०/०३/२०२३ रोजी १४.३० वाजता यातील फिर्यादी विलास आनंदराव बळवंते व त्यांच्यासोबत स. पो. नि. सुर्यवंशी, पो. शि. येवते, पो. शि. इंगोले असे मिळुन पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असताना ते माळेगाव ते मरडसगाव रोड बनवस शिवार ३३ के. व्ही. जवळ पोहचले त्यावेळी त्यांना समोरून एक पांढऱ्या भगव्या रंगाचा टिप्पर क्र. एम-एच-२२-एल.टी-२७०६ जाताना दिसला. त्यांनी त्या टिप्पर चाकलास थांबवुन त्याची पाहणी केली असता त्यामध्ये दोन ब्रास इतकी रेती असल्याचे त्यांना आढळले. सदरचा टिप्पर हा आरोपी चालवत होता. आरोपीकडे सदर रेतीची वाहतुक करण्याचा परवाना नव्हता. सदरचा टिप्पर हा आरोपीच्या मालकीचा असुन तो स्वतःच्या फायद्याकरिता त्यामध्ये अंदाजे दोन ब्रास इतकी रेती भरून, विना परवाना बेकायदेशीररित्या शासनाचा कर बुडवून तिची चोरी करून वाहतुक करताना मिळुन आला म्हणुन फिर्यादीने पोलीस स्टेशन पालम येथे त्याचेविरूध्द फिर्याद दाखल केली.

**०३.** आरोपीचेविरूध्द गुन्हा रजिस्टर नं. ४८/२०२३ हा भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८(७) व (८) प्रमाणे पालम पोलीस स्टेशन येथे नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. एस. सुर्यवंशी, पोलीस स्टेशन, पालम यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांची टिपणे नोंदविली. तपासाअंती आरोपीचेविरुद्ध सबळ पुरावा मिळाल्याने त्यांनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८(७) व (८) प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याकरीता दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** दोषारोपाप्रमाणे माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर नि.११ कडे भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३७९ व जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) व (८) अन्वये दंडनिय अपराध केल्याबाबत दोषारोप ठेवला. त्यामधील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** आरोपीविरुध्दच्या गुन्ह्याच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षातर्फे या न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मधील साक्षीपुराव्याचा आधार घेतला. तद्नंतर अभियोग पक्षाने याकामी उर्वरित साक्षीदारांना तपासलेले नसल्याने त्यांचा पुरावा बंद केला. अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीवरून आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आल्याने आरोपीचे निवेदने नोंदवण्यात आले.

**०६.** सहाय्यक सरकारी वकील श्री. पी. एन. सोळंके व आरोपींकरीता वकील श्री.एस. आर. रोकडे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात.ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. २०/०३/२०२३ रोजी १४.३० वाजण्याच्या दरम्यान मौजे बनवस, ता. पालम, जि. परभणी येथील माळेगाव ते मरडसगाव रोडवर आरोपीने शासनाच्या संमतीशिवाय अवैधरित्या टाटा | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीच्या टिप्पर क्र. एम–एच–२२–एल.टी–२७०६ मध्ये २ ब्रास इतकी रेती भरून तिची चोरी केली असल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने विना परवाना बेकायदेशीररित्या शासनाच्या संमतीशिवाय गौणखनीज रेतीचे उत्खनन करून त्याची वाहतुक केली आणि शासनाचा महसुल बुडवला असल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | **नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीताः–</u>**

**०७.** आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने आरोपी शासनाच्या संमतीशिवाय, शासनाचा कर बुडवुन २ ब्रास रेती टिप्पर क्र. एम–एच–२२–एल.टी–२७०६ मधुन वाहतुक करून चोरी केली असल्याची बाब शाबीत करणे आवश्यक आहे.

**०८.** अभियोगपक्षाने आरोपींविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता सा.क्र.२ विलास (नि.२९) यांची साक्ष नोंदवली आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, दि.२०/०३/२०१९ रोजी ०२.३० वाजता ते व इतर पोलीस कर्मचारी हे सरकारी वाहनाने माळेगाव ते मरडसगाव असे पेट्रोलींग करत असताना बनवस शिवारात ३३ के. व्ही. जवळ पोहचले त्यावेळी समोरून पांढऱ्या भगव्या कलरचा टिप्पर क्र. एम–एच–२२–एल.टी.२७०६ हा त्यांना दिसला. त्या टिप्परला त्यांनी थांबवले आणि त्याच्या चालकास नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गजानन नागोराव पोले असुन टिप्परमध्ये वाळु असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी टिप्परमध्ये पाहिले असता, त्यामध्ये दोन ब्रास इतकी वाळु होती. त्यांनी चालकास वाळु वाहतुक करण्याच्या परवान्याबाबत विचारले असता, त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. यावरून त्यांना सदर आरोपी हा अवैधरित्या वाळुची वाहतुक करत असल्याचे समजले. त्यानंतर स.पो.नि. सुर्यवंशी यांनी जप्ती पंचनामा केला व वाळु आणि टिप्पर

जप्त केले. सदर गुन्ह्याबाबत त्यांनी फिर्याद (नि.३०) व प्रथम खबरी अहवाल (नि.३१) दाखल केला. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासादरम्यान मान्य केले आहे की, माळेगाव ते बनवस रोडच्या आजुबाजुस बऱ्याच शेतकऱ्यांची घरे व शेती आहे व तो रोड रहदारीचा आहे. अवैधरित्या वाळु वाहतुक करणाऱ्यावर कारवाई करण्याचे अधिकार महसुल अधिकाऱ्यास आहे. परंतु, त्यांनी त्याबाबतची माहिती महसुल विभागास दिली नाही.

०९. अभियोग पक्षातर्फे तपासलेले सा.क्र. ३ व्यंकट (नि.२६) यांनी त्यांच्या सरतपासात सा.क्र. २ विलास यांच्यासारखी कथने केली आहेत. पुनरावृत्ती टाळण्याकरिता ती कथने परत इथे नमुद करत नाही. सदर साक्षीदाराच्या उलटतपासादरम्यान असे आले आहे की, माळेगाव ते मरडसगाव हा रहदारीचा रस्ता आहे. घटनेच्यादिवशी ज्यावेळी त्यांनी टिप्पर थांबवला होता त्यावेळी त्याठिकाणी लोक जमा झाले नव्हते.

१०. अभियोग पक्षाने तपासलेले सा.क्र. २ विलास व सा.क्र. ३ व्यंकट हे पोलीस साक्षीदार आहेत. त्यांनी पेट्रोलींग करत असताना आरोपी हा अवैधरित्या वाळुची चोरी करून तिची वाहतुक करत असताना मिळुन आला असल्याचे कथन केले आहे. परंतु, सदर साक्षीदारांच्या कथनास इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराने दुजोरा दिलेला नाही. घटनास्थळ हे रहदारीचा रस्ता असल्याची बाब सा.क्र. २ विलास व सा.क्र. ३ व्यंकट यांनी मान्य केली आहे. तसेच घटनास्थळाच्या आजु–बाजुला घरे असल्याचे बाब ही उलटतपासादरम्यान पटलावर आली आहे. घटनास्थळ हे रहदारीचे व लोक वस्तीचे ठिकाण असुन देखील अभियोग पक्षाने इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. सदरची घटना ही दिवसभरात दुपारी ०२.३० ते ०३.०० च्या दरम्यान घडली असुन कारवाई करतेवेळी त्याठिकाणी लोक जमा झाले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. मुळात घटनास्थळ हे रहदारीचे असुन व दुपारची वेळ असुनही सदर रस्त्यावर आरोपीवर कारवाई करताना त्याठिकाणी कोणतेही लोक जमा न झाल्याचे कथन विश्वासार्ह वाटत नाही.

११. आरोपी हा अवैधरित्या टिप्परमधुन वाळुची चोरी करून वाहतुक करताना मिळुन आला. त्याटिप्परमधील वाळु व सदरचा टिप्पर हा स. पो. नि. सुर्यवंशी यांनी दोन पंचांच्यासमक्ष जप्त केला असल्याचे कथन सा.क्र. २ व ३ यांनी केले आहे. सदर कथनांच्या अनुषंगाने अभियोग पक्षाने सा.क्र. १ गंगाधर यांची साक्ष नि.१५ कडे नोंदवली आहे. सदरची साक्षीदार हे

जप्ती पंच व घटनास्थळ पंच साक्षीदार आहेत. सदर साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, सदर साक्षीदाराने सरतपासादरम्यान घटनास्थळ व जप्ती पंचनामा त्यांच्या समक्ष झाला असल्याची बाब नाकारली आहे. जर सा.क्र. २ व ३ यांच्या कथनाप्रमाणे आरोपी हा अवैधरित्या वाळुची चोरी करून त्याची वाहतुक करत होता आणि त्याला सदर वाळुसह सा.क्र. १ यांच्यासमक्ष पकडले होते तर सा.क्र. १ जे की घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत त्यांनीच सदरची बाब नाकारली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा झाला असल्याची बाब सुचक प्रश्न विचारून देखील नाकारलेली आहे. अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा सिध्द करण्याकरिता अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष याकामी नोंदवलेली नाही. जप्ती पंचनामा करणारे स.पो.नि. सुर्यवंशी यांची देखील सदर कामी साक्ष नोंदवलेली नाही. जप्ती पंचनामाच सिध्द झाला नाही तर आरोपीच्या ताब्यातुन अवैधरित्या वाहतुक व चोरी झालेली वाळु जप्त केली असल्याची बाब सिध्द होत नाही. फिर्यादीने आरोपी हा चोरी करून अवैधरित्या वाळुची वाहतुक करत असल्याबाबत महसुल विभागास देखील कळवलेले नाही.

१२. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे जर फिर्यादी व इतर पोलीस हे पेट्रोलींग करत असताना त्यांना आरोपी वाळुची चोरी करून वाहतुक करताना मिळुन आला होता तर ती बाब सिध्द करण्याकरीता त्यांनी पेट्रोलींगला असणारे इतर साक्षीदार यांना तपासलेले नाही. घटनास्थळ सिध्द करण्याकरीता तपासलेले पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ सिध्द झालेले नाही. आरोपी हा वाळुची चोरी करून तिची वाहतुक करताना मिळुन आला व त्याच्या ताब्यातुन वाळु वाहतुक करणारा एक टिप्पर वाहन वाळुसह जप्त केल्याची बाबही अभियोग पक्षाने सबळ पुराव्याने पटलावर आणलेली नाही. जप्ती पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. त्यामुळे जप्तीपंचनामा सिध्द झालेला नाही. आरोपी हा वाळुची चोरी करून वाहतुक करत होता ही बाब प्रत्यक्षरित्या पाहणारे स्वतंत्र त्रयस्थ साक्षीदार याकामी अभियोग पक्षाने तपासलेले नाहीत. तपासीक अंमलदार यांची साक्ष अभियोग पक्षाने संधी देवुन नोंदवलेली नाही. सा.क्र. १ व सा.क्र. २ आणि सा.क्र. ३ यांच्यातील विसंगत कथने पाहता निव्वळ सा.क्र. २ व ३ यांच्या साक्षीवरून आरोपी अवैधरित्या वाळुची चोरी करून तिची वाहतुक करताना मिळुन आला असल्याची बाब सिध्द होत नाही.

१३. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) व (८) मधील तरतुदींनुसार महसुल अधिकारी यांना गौण खनिज उत्खनन, वाहतुक आणि जप्त वाहनाबाबत

दंड करण्याचे अधिकार आहेत. सदर न्यायालयास त्या तरतुदीनुसार दंड करण्याचे अधिकार नाहीत.

१४. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबित करण्याकरीता अभियोग पक्षाने संशयापलीकडे जावून आरोप सिध्द करणे गरजेचे असते. अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरून आरोपीचेविरूध्द गुन्हा सिध्द होत नाही. यदाकदाचित अशा प्रक्रियेत संशयाचा एक जरी धागा निर्माण करण्यास आरोपी यशस्वी ठरला असेल तर त्याचा फायदा आरोपीला मिळतो. या खटल्यामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणेत आलेला नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देण्यात येतो. यास्तव मुद्दा क्र. १ व २ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ करीताः–**

१५. उपरोक्त विवेचनावरून अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला उचित वाटते.

१६. या न्यायनिर्णयाच्या मुद्देमाल रकान्यात नमुद केलेला जप्त मुद्देमाल म्हणजेच एक पांढऱ्या भगव्या रंगाचा टाटा टिप्पर क्र. एम–एच–२२–एल.टी–२७०६ याचा ताबा अंतरीम ताबा या न्यायालयाने आरोपीकडे दिला आहे. सदर मुद्देमालावर आज अखेर कोणीही मालकी अथवा हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे त्याचा ताबा अपील कालावधीनंतर त्यांच्याकडे कायम करणे उचित राहील. तसेच जप्त मुद्देमाल दोन ब्रास रेतीची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता आदेशीत करणे उचित राहिल असे मला वाटते. सबब मी मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

**:: आदेश ::**

१. **आरोपी गजानन नागोराव पोले** याची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८(७) व (८) च्या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**३.** दोषारोपपत्रामध्ये नमुद केलेला जप्त मुद्देमाल म्हणजेच पांढऱ्या भगव्या रंगाचा टाटा टिप्पर क्र. एम–एच–२२–एल.टी–२७०६ चा ताबा अपील कालावधीनंतर आरोपीकडे कायम करण्यात येतो.

**४.** जप्त मुद्देमाल दोन ब्रास रेतीची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

**५.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रु.५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.07.31 17:24:53 +0530

(मनिषा म. पाटील)

दिनांकः– ३१/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.